पुणे महानगरपालिका

*** शहर सुधारणा समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक – १२**

**शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दि. २४ /०९ /२०१० रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्र. ६४**

**मा.सौ.अश्विनी कदम, मा.दत्ता धनकवडे यांचे दि. २३/०८/२०१० चे पत्र.**

शहर सुधारणा समिती ठराव क्र. २३८, दि. १०/०२/२०१० दफ्तरी दाखल करण्यात यावा.

( पर्वती स. नं. ६३, प्लॉट क्र. ८ मधून पुणे सातारा रस्त्यापासून मोरे वस्ती या घोषित झोपडपट्टीपर्यंत २० फुट रुंदीचा रस्ता बी. पी. एम. सी. ॲक्ट कलम २०५ अन्वये आखलेला रस्ता रद्द करण्यात यावा.)

**विषय क्र. ६५**

**मा.सुनिल झगडे व मा.विजय देशमुख यांचे दि. १३/०९/२०१० चे पत्र.**

कात्रज स.नं.२२ येथे आरक्षित जागेमुळे वहिवाटीचा रस्ता बंद झालेला आहे. या कारणाने लोकांना रस्ता मिळत नाही. सदर गुंठेवारीतील बांधकामाकरिता रस्ता उपलब्ध होणेकरिता कलम २०५ अन्वये १२ मी.डी.पी. रस्त्यावरून पश्चिमेकडून पूर्वेकडे ९ मीटर रस्ता आखण्यात यावा.

**विषय क्र. ६६**

**मा.सुनिल टिंगरे यांचे दि. १४/०९/२०१० चे पत्र.**

वॉर्ड क्र. २८ ( विद्यानगर लोहगांव ) मधील स.नं.२४१, २४२, २४५ च्या नैसर्गिक ओढ्या लगतची जागा नागरिक पुर्वी पासून अंत्यसंस्कार विधी करण्यासाठी वापरत आहेत.सदरची जागा आरक्षित नसल्याने त्या ठिकाणी स्मशान भुमी बांधता येत नाही. यासाठी सदर जागा अंदाजे एक एकर जागा स्मशान भुमिसाठी आरक्षित करणेत यावी.

**विषय क्र. ६७**

**मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. १४/०९/२०१० चे पत्र.**

वॉर्ड क्र. १ धानोरी स.नं.२४ मधील ६० फुटी डी.पी.रस्ता रद्द करण्यात यावा.

**विषय क्र. ६८**

**मा.भिमराव खरात व मा.निलेश निकम, सभागृह नेते यांचे दि. १६/०९/२०१० चे पत्र.**

वॉर्ड क्र. ७ लोहगांव विमानतळ या वॉर्डात विमाननगर निकोगार्डन सोसायटीच्या मागे व नगररोड पासून काश्मिरी सौफ कडे जाणारा काश्मिरी सौफच्या अगोदर उजव्या बाजुला सार्वजनिक वहिवाटीचा रस्ता स.नं.२०७ मधून कलम २०५ खाली आखण्यात यावा. सदर रस्ता हा अनेक वर्षापासून दुर्लेक्षित असून आजुबाजुला काही सोसायटी मध्ये नागरिक रहात असून रस्ता नसल्यामुळे त्यांची फार मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. सदरचा रस्ता कलम २०५ अन्वये केल्यास रस्ता ग्राऊट करून डांबरीकरण करता येईल व नागरिकांची होणारी गैरसोय दूर होईल.

**विषय क्र. ६९**

पुणे मनपाच्या मोकादम वर्ग ४ संवर्गातील सेवकांना मिस्त्री वर्ग ३ संवर्गात बढती देणेसाठी निवडयादी व प्रतिक्षायादीस मान्यता घेणेबाबत मा.अति.महा.आयुक्त ( वि ) यांचे जा.क्र.मआ/अतिमआ/उआ/से/३६७, दिनांक ६/९/२०१० चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**